**खग शाला**

उभा गरुड नगावरी
उडे घार उंच अंबरी

जीव घेऊनी उडे होला
पाठी आहे वैरी ससाणा

निळ्या नभी हिरवे कीर
शुभ्र पारवे फांद्यांवर

गाई कोकीळ आंब्यावरी
लपे घुबड ढोलीमधी

वायस करी काव काव
टिटवी करी टीव टीव

नाच नाचे चिऊ भूवरी
ताल धरी मोर पिसारी

– नारायण
०९/१६/२३